REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 6 | MARCH - 2021

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रिशिक्षण विषयक कार्य एक अभ्यास

**प्रा. कांबळे डी.एस.**
**भूगोल विभाग, जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदुर**
**ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)**

**सारांश:-**



भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या शिक्षण तत्वेत्या, पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्याविषयी आज आपण जाणून घेणार आहोत. भारतातील पहिल्या भारतीय शिक्षिका, स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ आहे. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्री-शुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासात अपूर्व अशी आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नान्न करून तडफडणाऱ्या हजारो जिवांच्या मुखांत घास भरवावा, शेतकरी सामाजिक सुधारणांसाठी वाङ्मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री आणि लेखिका बनावे, सर्व गाव, सर्व समाज सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याचे, जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री-शूद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे, दीनदलितांसाठी, दीनदलितांच्या मुलांसाठी रोगांच्या साथीत दिवसा रात्री घराबाहेर धावावे, त्यांची सेवा करावी, प्लेगच्या साथीत त्यांना कडेवर घेऊन आपल्या दत्तक मुलगा डॉ. यशवंतराव फुले यांच्या दवाखान्यात घेऊन जावे, तेथे प्लेगच्या रोगाला आपण बळी पडत असल्याची जाणीव होऊनही रुग्णांची सेवा करीत राहावी आणि ही सेवा करता करता अनंतात विलीन होऊन जावे. अशा या व्यक्तिमत्त्वास केवळ अलौकिक हे एकच विशेषण योजिता येईल.

**मुख्य शब्द:** पहिल्या शिक्षिका, फुले दांपत्याने शाळा काढल्या, शैक्षणिक कार्य

## परिचय:-

सावित्रीबाईंचे माहेरचे गाव नायगाव हे आहे, नायगाव हे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात आहे. नेवसे या घराण्याला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. या घराण्यातील पुरुष छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशवाईपर्यंत

वेगवेगळ्या मानाच्या पदांवर कार्य करत होते. सावित्रीबाईंच्या वडिलांना नायगाव पंचक्रोशीत मानाचे स्थान होते. नायगाव परिसरात किंवा नायगावच्या पंचक्रोशीत कोणत्याही प्रकारचा तंटाबखेडा निर्माण झाल्यास तो सोडवण्याचे काम सावित्रीबाईंचे वडील करत असत. कोणतीही व्यक्ती अडचणीत सापडली तर त्या व्यक्तीला ते मदत करत असत.

सावित्रीबाईंचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात जेथे सबंध गावात शंभर-दीडशे उंबरा सापडणे कठीण! गावाला वर्षानुवर्षे दुष्काळाची परंपरा लाभलेली अशा एका खेड्यात, ३ जानेवारी, १८३१ रोजी एका तेजस्वी कन्येचा जन्म झाला तीच तेजस्विनी, क्रांतीज्योती, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले! आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. त्यांचे वडील गावाचे पाटील होते. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई या ९ वर्षांच्या असताना इस १८४० मध्ये त्यांचा विवाह १३ वर्षे वयाच्या महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला, शिक्षणाचे संस्कार नाहीत, अशी ही निरक्षर कुटुंबात जन्मलेली वाढलेली स्त्री जोतीरावांच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरविते, शिक्षक प्रशिक्षण घेते, आणि ज्ञानदानाचे व्रत घेऊन ज्ञानयोगिनी बनते.

## शिक्षण:-

लग्न झाल्यावर जोतीरावांनी सावित्रीबाईंना घरीच लिहायला- वाचायला शिकवले. तो काळ स्त्रियांच्या दृष्टीने फारसा चांगला नव्हता. सावित्रीबाईंच्या शिक्षणाकरीता जोतीरावांच्या घरच्यांनीही मोठ्या प्रमाणात विरोध केला होता. परंतु सावित्रीबाईंच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी जोतीरावांनी घेतली.

## शिक्षणक्षेत्रातील कार्य:-

भारतातील पहिली शिक्षिका म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. तो यथार्थ असाच आहे. कारण एकोणिसाव्या सरकातील एकूणच स्त्री जीवन पाहिले तर एखाद्या स्त्रीने स्वतः शाळा शिकून ज्ञान संपादन करणे आणि स्वतः ज्ञान संपादन करून शिक्षिका होऊन इतरांना त्यातल्या त्यात दलितांच्या मुलींना शिकवणे ही कल्पनादेखील करणे शक्य याते, अशा काळात सावित्रीबाईंनी रूढींची चौकट मोडून, तथाकथित समाजाच्या ठेकेदारांची बंधने झुगारून ज्या धाडसाने शिक्षिका होण्याचा निर्णय घेतला त्याला इतिहासात तोड नाही. अर्थातच त्यामागे सावित्रीबाईंना प्रेरणा होती ती महात्मा जोतिबा फुल्यांची।

त्याकाळात स्त्रीवर ठायी ठायी अत्याचार होत होते. समाजधुरिणांनी हेतुपुरस्सररीत्या स्त्रीला आपल्या टाचेखाली दाबून ठेवली होती. समाजात अधश्रद्धा ठासून भरली होती. अज्ञान पराकोटीला पोहोचले होते. शिक्षण ही एक धार्मिक बाब समजली जात होती. स्त्रीला शिकण्याचा अधिकार नव्हता. अशा काळात सावित्रीबाईंनी केलेले महान शैक्षणिक कार्य पहाता कोणीही त्यांना मानाचा मुजरा केल्याशिवाय रहात नाही.

पुण्यात त्याकाळी ब्राह्मण समाजाचे वर्चस्व होते. पुरुषी संस्कृतीचा दबदबा होता. शिक्षणाचे महत्त्व ब्राह्मण जाणत होते. बहुजन समाज शिकला तर त्याच्या मनात वैचारिक जागृती निर्माण होईल. स्त्रिया जर शिकल्या तर त्यांना आत्मभान येईल. पुरुषाची गुलामगिरी त्या झुगारून टाकतील अशी भीती भटा-ब्राह्मणांना वाटत होती. त्यामुळे स्त्री शिक्षणाला त्यांचा फार विरोध होता.

स्त्री शिक्षणाचे दारे खुले करणारे व अतिशय प्रतिकुल परिस्थितीत पत्नीला शिक्षण देणारे आद्यक्रांतीकारक महात्मा ज्योतीराव फुले यांना वंदन केल्याशिवाय स्त्री शिक्षणाची वाटचाल मांडताच येणार नाही. स्त्रीयाना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी फक्त शिक्षणाची गरज आहे. या करीता ज्योतीराव फुले यांनी स्त्री शिक्षणाकरीता पहिली शाळा १८४८ मध्ये सुरु केली व सावित्रीफुले पहिली शिक्षिका ठरली दोघांनीही कोणतीही न डगमगता स्त्री शिक्षणासाठी जुन्या रुढी परंपरांना फाटा देण्यासाठी संघर्ष केले. १ जानेवारी १९४८ मध्ये पुण्यात सुरु झालेली मुलीची पहिली शाळा ही भारतातील पहिली शाळा ठरली. त्यावेळी सावित्रीबाई फुले व ज्योतीराव फुले यांना समाजातून फार मोठ्या प्रमाणात त्रास होत होता. कारण समाजातील अनेक लोक या दाम्पत्यांस फार विरोध करीत होते. अश्या अनेक संकटांचा सामना करुन त्यांनी स्त्रीशिक्षणाचा प्रसार केला. समाजातील अनेक स्त्रियांना शिक्षणाचे दारे उघडे करुन दिले. त्यावेळी शाळांची संख्या फार मोठया प्रमाणात वाढत होती. त्यामुळे प्रशिक्षीत शिक्षकांची अडचण भासू लागली. त्यामुळे प्रशिक्षीत शिक्षकांकरीता ज्योतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी ट्रेनिंग स्कुलची स्थापना केली. या ट्रेनिंग स्कूल मधून पहिली विद्यार्थीनी फातीमा शेख ही मुस्लीम महिला ट्रेन झाली होती या मुलीने सावित्रीबाईच्या शाळेत पहिली मुस्लीम शिक्षीका म्हणून कार्य सुरु केली. त्या काळात गरीबीचे प्रमाण फार होते. त्यामुळे शिक्षण घेतांना फार अडचण होत होती. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी मुलीच्या आवडीचा अभ्यास क्रम सुरु केला. मुलींना पाटी, दप्तर, पुस्तक व इतर शालेय साहित्य शाळेकडून देण्यात आले. तसेच त्यांच्या पालकांना साक्षरता अभियान, अनेक कोर्सेस आर्थिक स्वावलंबनावर आधारीत निर्माण करण्यात आले होते. शिक्षणाने मनुष्याचे जीवन बदलून जाते व विचारांचा व मनाचा विकास होतो असे सावित्रीबाई फुले यांना वाटत होते.

आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे शिक्षणासाठी पुण्यात सावित्रीबाईनी स्वतःच्या घरात वसतिगृहाची व्यवस्था केली होती. सावित्रीबाई मुलीवर आईपेक्षा जास्त प्रेम करत. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होईल या द्दष्टीने प्रयत्न केले. या संदर्भातील एक घटना अतिशय महत्वपूर्ण ती म्हणजे सावित्रीबाई फुले यांच्या शाळेतील मुक्ता साळवे नावाच्या मातंग समाजातील एका विद्यार्थीनीने स्वतःचे आत्मकथन करणारा एक निबंध लिहीला होता. त्या विद्यार्थीनीने लिहीलेला निबंध फारच दर्जेदार होता तो मराठी वाङमयासाठी अतिशय महत्वाचा मानदंड होता. ब्राम्हण लोक म्हणतात की वेद ही आमचीच सत्ता आहे. ब्राम्हणेतरास वेदांचा अधिकार नाही यावरुन जर आम्हास धर्मपुस्तक पाहण्याची मोकळीक नाही तर आम्ही धर्म रहीत आहोत हे असे साफ दिसते की नाही बरे ! हे भगवंता तुझ्याकडून आलेला कोणता धर्म आम्ही स्विकारावा हे लवकर कळव म्हणजे त्या प्रमाणे तजबीज करता येईल या प्रकारे चकीत करणारे तिच्या निबंधाचे वाक्य होते.

सावित्रीबाई फुले यांनी ज्योतीरावांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री सुधारणेसाठी 'महिला सेवा मंडळा' ची स्थापना केली. संस्थेच्या अध्यक्षपदी पुण्याच्या कलेक्टरच्या पत्नी इ. सी. जोन्स होत्या, त्यांच्या कार्य काळात स्त्रीयांचा सार्वजनिक तिळगुळ समारंभ कार्यक्रम घेण्यात आला.

सावित्रीबाई फूले स्त्री शिक्षणाकरीता शाळेतुन घरी येतांना अनेक लोकांनी शिवीगाळ केली. सावित्रीबाई म्हणतात मला या लोकांनी अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या, मला खडे मारले, माझ्या अंगावर थुकले, शेण आणि चिखल माझ्या अंगावर फेकला मला धर्मबुडवी म्हटलं मला महारीण म्हटलं, मला द्दष्ट आणि पाखंडी म्हटलं अश्या प्रकारचा भयानक त्रास सहन करावा लागला. सावित्रीबाई मुलींना सांगतात की तुम्ही लिहीत आहात या आनंदानेच माझ मन भरुन आले. तुम्ही लिहीता ती अक्षर क्रांतीची लाडकी अक्षर ठरणार आहेत. या अक्षराचे शब्द होतील आणि त्या काळातून नव्या वाटा निघतील वाटा मुक्तीच्या वाटा, स्वतंत्र्याच्या वाटा आणि समतेच्या असा आत्मविश्वास मुलीना सावित्रीबाई नी दिला व शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

सावित्रीबाई म्हणतात मी जगेन सर्वांचेच जगण सुंदर व्हावं यासाठी जगेन मला खात्री आहे हा माझा निर्धारच मला शक्ती देईल ही माझी निष्ठाच मला वेग देईल आणि दुःखी कष्टी लोकांसाठी काही करण्याची माझी तळमळच मला प्रेरणा देत राहील, सावित्रीबाईच्या शाळांमध्ये अत्यंत मेहनती, प्रामाणिक, इमानदार, शिक्षक ध्येयवादी सुध्दा होते. त्यामुळे उच्च वर्णामधील मुलांसाठी असलेल्या शाळांमधील पटसंख्येपेक्षा सावित्रीबाईच्या शाळेतील पटसंख्या दहापटीने जास्त होती. सावित्रीबाई फुले यांनी ज्योतीराबांच्या सहकार्याने विधवा विवाह, बालविधवा, स्त्रिभ्रूणहत्या यांचा प्रखर विरोध केला. याशिवाय स्त्री सुधारणांचा पुरस्कार केला. स्त्रीयांवरील अन्यायाची विषमतेची कारणे शोधून काढली.

सावित्री नसती तर नसतो शिकलो आम्ही
निरक्षर राहीलो असतो चार भिंतीत अधिपत्याखाली
मनुवादी संस्कृतीच्या केले असते फक्त काम
आणि कामच तेही रांधा वाढा उष्टी काढा
दानधर्म अन दक्षिणा द्याभटाला
करा सत्यनारायण आणि फेरे वढाला

सत्यवादाच्या सावित्रीपेक्षा क्रांतीज्योतीचे चारीत्र्य पाहणे आजच्या आधूनिक स्त्रीने अनेक धार्मीक ग्रंथापेक्षा फार पवित्र आहे प्रत्येक कृती ही आपल्या जिवनाला आदर्श करणारी अशीच आहे.

शिक्षणाची ज्योती सावित्रीबाई फुले
जिवनाचे दुःख त्यांनी स्वतः झेलले
साक्षरतेचे महान कार्य ज्यांनी केले
निरक्षराच्या अश्रुची झाली फुले
विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून ।
तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन ।।

१८९७ मध्ये बोबोनिक किंवा गिल्टी प्लेग संपूर्ण महाराष्ट्रात पसरला. सावित्रीबाई नुसत्या प्रेक्षक राहिल्या नाहीत तर त्या पीडित भागात मदतीसाठी गेल्या. प्लेगग्रस्त लोकांसाठी त्यांनी पुण्यातील हडपसर येथे दवाखाना उघडला आला होता. प्लेगच्या रुग्णाच्या मदतीला सावित्रीबाई धावून गेल्या. रात्रंदिवस त्या रोग्यांची सेवा करू लागल्या. है यशवंताला कळताच तो आईला भेटायला पुण्याला परतला.

पुण्याच्या झोपडपट्टी भागात प्लेगची साथ जोरात होती. सावित्रीबाई त्या भागातच सेवा करीत होत्या. ज्या रुग्णाला लागण झाली त्याचा मृत्यू निश्चित होता. यशवंत आपल्या आईच्या मदतीला धावून आला. त्यानेही प्रयत्नांची पराकाष्टा केली, पण यश येईना.

सेवेचे व्रत अंगीकारलेल्या सावित्रीबाईंनाही न कळत प्लेगची लागण झाली होती. ही गोष्ट त्यांना ताप आल्यावर यशवंताच्या लक्षात आली. त्याने तातडीने शर्थीचे प्रयत्न केले, पण त्याला यश आले नाही. १० वर्षांच्या प्लेगग्रस्त मुलाला त्याच्या हाताला धरून हॉस्पिटलमध्ये घेऊन जात असताना ती स्वतःच या आजाराची शिकार झाली. अखेर दि. १० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाई इहलोकाची यात्रा संपवून निघून गेल्या. यशवंत आणि राधा यांच्या दुःखाला सीमा राहिली नाही. त्यांनी दुःखाने हंबरडा फोडला. एक आई अनेकांना अनाथ करून गेली होती. चंदनाचा देह अनेकांचे जीवन सुगंधित करून गेला. धन्य ती माता। अशी होती सावित्रीबाई - प्रेमळ, कष्टाळू, त्यागी, कणखर ... अशा ओळखीमागे, इतिहासमागे सावित्रीबाईचे त्याग, कष्ट आणि अहोरात्र केलेली मेहनत आहे, हे विसरता येत नाही. सावित्रीबाई फुले यांनी आपले जीवन सामाजिक ऐक्य, स्त्रीशिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी समर्पित केले; सावित्रीबाईंचे देशासाठीचे योगदान अनन्यसाधारण आहे. सावित्रीबाई आज सर्व महिलांसाठी प्रेरणास्रोत आहेत. त्यांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी नमन!

"त्यागालाही वाटावी लाज
आई सावित्रीबाई तुझा त्याग
तुझ्या त्यागानेच निर्माण झाला
आम्हा लेकराचा अभिमान ....."

**निष्कर्ष:-**

सावित्रीचाई फुले यांनी अनेक अडचणीचा सामना करुन स्त्री शिक्षणाचे पवित्र कार्य पुढे नेले. त्यामुळे आजच्या काळात स्त्री शिक्षणामुळे पुढे गेलेली आहे. स्त्री शिक्षणामुळे संपूर्ण कुटुंबाची प्रगती झालेली आहे. याचे संपुर्ण श्रेय सावित्रीबाई फूले यांना जाते. भारतामध्ये अनेक स्त्रिया उच्च पदावर कार्यरत आहेत. चूल आणि मूल ही संकल्पना बाजुला ठेऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रिया ह्या चांगल्या पदावर कार्य करत आहेत. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासोबत समाज परिवर्तनाचे महत्वाचे कार्य केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढत आहे त्या क्षेत्रात स्त्रीयाना आरक्षण सुध्द आहे. यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार व राजकारणात सहभाग वाढत आहे.

विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून । तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन ।।

**संदर्भ ग्रंथ:-**

1) चैतन्याचे चांदणे डॉ. यशवंत पाटणे संस्कृती प्रकाशन, पुणे
2) क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले- ॲड शैलजा मोळक जिजाई प्रकाशन, पुणे.
3) रमाई मी सावित्री मी यशोधरा डॉ यशवंत मनोहर युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.
4) महात्मा जोतीराव फुले- उमेश बगाडे महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच.
5) सावित्रीबाई जोतीराव फुले कार्य आणि कर्तुत्व- मोगल जाधव सनय प्रकाशन,पुणे.
6) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मा.गो.माळी मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस,ठाणे.
7) थोर तेजस्वीनी सावित्रीबाई फुले सुभाषचंद्र वैष्णव चेतक बुक्स,पुणे.